# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

(स्थापना विभाग)

जाहिरात क्र. २७ /ज.स./2020 दि. 16/05/2020

## थेट मुलाखत

नागपूर महानगरपालिका अंतर्गत कर्मचाऱ्यांची करण्यात आलेली वेतन निश्चितीची अचूकता पडताळणीसाठी, डीसीपीएस अंतर्गत प्रकरणाची तपासणी करण्यासाठी, निवृत्ती प्रकरणे तपासणी करून अतिरिक्त प्रदानाचा शोध घेणे, महालेखाकार व स्थानिक निधी लेखा परिक्षण पथकाने घेतलेल्या आक्षेपाचे निराकरन करणे व याशिवाय विभागातील विशिष्ट प्रकरणी तपासणी करून अभिप्राय नोंदविणे तसेच वेतननिश्चिती करण्यासाठी मार्गदर्शन करणे, विभागाने केलेली वेतन निश्चिती अचूक व बरोबर असल्याची खात्री करण्यासाठी तसेच महानगरपालिकेचे अंदाजपत्रक तयार करण्याकरिता, इत्यादी कामासाठी, महाराष्ट्र शासन, लेखा व वित्त सेवेतील, किंवा स्थानिक स्वराज्य संस्था महामंडळे व इतर शासकीय सेवेतील सेवानिवृत्त लेखाधिकारी, गट–ब संवर्गातील, वेतनमान रू. 9300–34800 – ग्रेडवेतन रू. 4600 व त्याहून अधिक असलेल्यांची, वित्त विभागांतर्गत "**लेखा सल्लागार**" या पदावर कंत्राटी / करार तत्वावर शासन निर्णय दि. 17 डिसेंबर, 2016 नुसार अनुज्ञेय मासिक पारिश्रमिक तत्वावर प्रथमतः 6 महिन्याच्या कालावधीकरिता, नियुक्ती करावयाची आहे.

उक्त कामांचा अनुभव असलेल्या व महाराष्ट्र शासन, लेखा व वित्त सेवेतील, किंवा स्थानिक स्वराज्य संस्था महामंडळे व इतर शासकीय सेवेतील "लेखाधिकारी" या पदावरून सेवानिवृत्त झालेल्या इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखतीकरिता आवश्यक कागदपत्रांसह दि. 22/05/2020 रोजी सकाळी 10 : 30 वाजता, अति. आयुक्त (शहर), सिव्हील लाईन्स, म.न.पा. नागपूर यांचे कार्यालय येथे उपस्थित राहावे.

| अ. क्र. | पदाचे नांव | एकुण पदे | प्रवर्ग | वयोमर्यादा | अनुभव. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | लेखा सल्लागार | 03 | खुला – 2<br>अजा – 1 | कमाल 65 वर्षे | महाराष्ट्र शासन, लेखा व वित्त सेवेतील, किंवा स्थानिक स्वराज्य संस्था महामंडळे व इतर शासकीय सेवेतील "लेखाधिकारी" या पदावरून सेवानिवृत्त झालेले, गट–ब संवर्गातील, वेतनमान रू. 9300–34800 – ग्रेडवेतन 4600 व त्याहून अधिक असलेले व प्रस्तावित कामाचा किमान 3 वर्षाचा अनुभव. |

उपरोक्त पदाकरिता अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावयाचा असून अर्जाचा नमूना व उक्त पदांकरिता आवश्यक अर्हता /अटी / शर्ती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर उपलब्ध आहे.

(तुकाराम मुंढे)<br>
आयुक्त<br>
महानगरपालिका, नागपूर

Advt. No. 27/PR<br>
दि. 16/05/2020

Nagpur Mahanagarpalika Recruitment 2020